"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

मासिकांक २५

जून २०२३



# “ती”चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी

संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# अनुक्रमणिका


१. प्रस्तावना ३

२. अंतरीचे सूर - गज़ल संग्रह ४

३. आषाढाच्या पहिल्या दिवशी ८

४. दुहिता ११

५. भेटी लागे जीवा १२

६. तीर्थरूप १४

७. आनंदाचे डोही आनंद तरंग १९

८. राजयोगिनी : अहिल्याबाई होळकर २१

९. आईपण २४

१०. सूर तेच छेडीता २७



www.tichapaan.com

tichapaan@gmail.com

Facebook Page

७३७८४९९९७७

@tichapaan



अतिथी संपादक: सौ. सुषमा (देशपांडे) मुलमुले

संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

मुखपृष्ठ व अंक मांडणी: श्री. अक्षय देशपांडे

मुखपृष्ठ छायाचित्र: श्री. अक्षय देशपांडे

सदर अंक डॉ. स्वाती धर्माधिकारी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने दिनांक ३० जून २०२३ रोजी प्रकाशित होऊन www.tichapaan.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला.



टीप: या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनातील मतांशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

# प्रस्तावना

## सायली देशपांडे

रसिकहो नमस्कार,

"ती" चं पान या उपक्रमाने द्वितीय वर्षपूर्ती करून तिसऱ्या वर्षात पदार्पण केले आहे. तेव्हा या तिसऱ्या वर्षातील दुसरं पाऊल म्हणजे हा जून २०२३ चा मासिकांक. नवीन ऊर्जा, नवीन कल्पना, नवीन विषय, नवीन लेखनशैली या विविधतेने हा अंक आपल्या पसंतीस उतरेल अशी आशा व्यक्त करते.

या संपूर्ण उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक मासिकांक हा वेगवेगळ्या पार्श्वभूमीवर आधारलेला होता. आत्तापर्यंत आमचे अंक नियमित प्रकाशित होत होते परंतु प्रत्येक लेखिकेची व्यस्तता बघता या पुढील आमचे अंक वर्षातून पाच या पद्धतीने प्रकाशित होतील. हा एक महत्त्वाचा बदल आम्ही या वर्षपासून केला आहे तेव्हा या बदलाचे स्वागत सुद्धा आपण आनंदाने करावे.


अतिशय कमी काळात जास्तीत जास्त लिहिते हात आम्हाला या माध्यमातून मिळत गेले आणि हा प्रवास दिवसेंदिवस बहरात गेला. या अंकाबद्दल बोलायचे झाल्यास या अंकात विषयांची विविधता प्रामुख्याने दिसून येते. जून महिन्यात मुख्यत्वे असणारे दिनविशेष या अंकाचा मुख्य गाभा आहेत. विठुरायाच्या दर्शनाला आसुसलेल्या भक्तांची वारी किंवा पितृदिना निमित्त आपल्या बाबांच्या विचारांचे आणि कर्तुत्वाचे कौतुक, कथा, अहिल्याबाई होळकर जयंती, कालिदासाचे मेघदूत असे ना ना विषय आपल्याला या अंकात आपल्याला वाचायला मिळतील. प्रामुख्याने उल्लेख करायचा तर या अंकात डॉ. प्रज्ञाताई आपटे यांनी मा. आशाताई पांडे यांच्या अंतरीचे सूर या गज़ल संग्रहाचे केलेले विश्लेषण आणि कौतुक नक्कीच या अंकाला लाभलेले आशीर्वाद आहेत.

अशा या बहुरंगी असलेल्या "ती"च्या शब्दप्रवासात तुम्ही सुद्धा सहभागी होऊन वाचनाचा आनंद घ्या..!

# अंतरीचे सूर- गज़ल संग्रह

डॉ. प्रज्ञा आपटे

माधव ज्युलियन यांनी उर्दू गज़लेचा बुरखा फाडून तिला मराठीचा शेला पांघरवला. नवख्या वातावरणात ही गज़ल मंद पावलांनी पुढे आली. ती (साज ल्यायलेली) होती म्हणून अनेकांच्या मनाचा ताबा तिने घेतला.




तरफदार वाढले, प्रशंसक वाढले. गज़लकार वाढले पण गज़ल उंबरठा ओलांडून प्रशस्त दालनात आली नाही. विपरीत परिस्थितीला तडफदारपणे सामोरे जाणाऱ्या सुरेश भटांनी हे शिवधनुष्य उचचले. अवघडलेल्या गज़लेला साहित्य दरबारात आणले, रसिकांशी तिचे नाते जोडले आणि मराठी गज़लेची स्वतंत्र ओळख निर्माण झाली. गज़ल बहरू लागली मैफली, मुशायरे रंगू लागले, तरीही गज़ल एकटीच होती. महिला गज़लकार मात्र तिच्या सोबतीला नव्हत्या. धाडस दाखविले आशा पांडे ह्यांनी. जुलै २००० ला त्यांनी 'अंतरीचे सूर' हा गज़ल संग्रह प्रकाशित केला आणि त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला गज़लकार ठरल्या. निर्विवादपणे सिद्ध झालेली ही गोष्ट स्वीकारायला मान्यवरांना, मोठ्या संस्थांना २३ वर्षे लागलीत. आता-आता लोक हे मान्य करू लागले आहेत. अशा अन्यायकारक परिस्थितीचा,

मानसिकतेचा गज़लकारावर काय परिणाम होऊ शकतो ह्याचा साधा विचार ही कुणी केला नाही. हेच शल्य आशाताईंना बोचले. स्त्रीजातीच्या वाट्याला येणारी ही उपेक्षाच आशाताईंसारख्या संवेदनशील व्यक्तीला हेलावून टाकते. प्रतिकार करावासा वाटतो पण कसा करणार हा प्रश्न उभा राहतो. भांडणार कोणाशी आप्तांशी की प्राप्ताशी

समाजाशी की समांतर धावणाऱ्या परिस्थितीशी परंपरांच्या जनकाशी की त्यांना चिकटून राहणाऱ्या प्रियजनांशी, प्रस्थापितांशी की विस्थापितांशी? आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर उभे असलेले प्रश्नांचे मोहोळ कवयित्रीच्या अंतर्मनाला ढवळून टाकते. पाश्चात्य विचारवंत जोसेफ कोन्राड म्हणतात – 'या जगात स्त्री म्हणून जगणे हे भयावह असे आव्हान आहे. याचे कारण या जगण्याचा मुख्य भाग असतो तो पुरुषाशी जुळवून घेण्याचा.'

जुळवून घेण्याची जबाबदारी स्त्रीची, ती गृहलक्ष्मी. तिने नारायणाचे पाय चेपायलाच हवेत. मुळात आपल्या संस्कृतीनेच पुरुषांना झुकते माप दिले आहे. अहिल्या, द्रौपदी, तारा, सीता हा सगळ्या अभिशापाच्या अपमानाच्या अग्नीत होरपळलेल्या स्त्रिया. समाज स्त्रीकडून पराकोटीच्या सोशिकतेची अपेक्षा करतो. ही अपेक्षा स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व नाकारते, ती माणूस आहे, तिला मानवी भाव-भावना आहेत हे सत्य नाकारले जाते. तिने 'स्व' विसरूनच जगावे हाच परंपरांचा दंडक तिला लावला जातो. उच्चभ्रू समाजातील दंडक वेगळे, त्या स्त्रियांचे प्रश्न वेगळे, दुःख वेगळे. कष्टकरी निम्न वर्गाच्या स्त्रियांचे आयुष्य वेगळे आणि मध्यमवर्गीय स्त्रियांचे आयुष्य ह्या दोघींपेक्षा खूप निराळे. आत्मभान जागलेली, स्वअस्तित्वाची जाण झालेली ही स्त्री बुद्धिमान, कर्तृत्ववान अशी ही स्त्री समाजाकडून स्विकृतीची अपेक्षा करते. ती शिकलेली आहे, सुसंस्कृत आहे. तिला समान सम्मान हवा असला तरी ती त्यासाठी भांडू शकत नाही. तिच्या स्त्रीत्वाच्या मर्यादांचे भान तिला आहे आणि त्यामुळेच तिचा कोंडमारा होतो, घुसमट होते. समाज तिच्याकडून सगळ्या अपेक्षा करतो तशा ती ही समाजाकडून अपेक्षा करते. एकतर्फी प्रेमासारखे हे एकतर्फी समायोजन खूप अवघड असते, क्लेशकारक, मानहानी करणारी असते. मन हळहळते, व्याकुळते आणि स्वतःच स्वतःचे सांत्वन करून शांत होण्याचा प्रयत्न करते. हे स्वसांत्वन म्हणजेच आंतरिक समाधानाचा शोध. ह्यासाठी संत आळवतात अभंग, कवी लिहितात कविता.. आशाताईंनी छेडले 'अंतरीचे सूर' ह्या ग़ज़ल संग्रहाला ही पार्श्वभूमी आहे. मध्यमवर्गीय स्त्री - जीवनाचे हे शब्दचित्र आहे. त्या स्त्रीवर्गाचे प्रतिनिधित्व करणारा हा संग्रह आहे. आत्मक्लेशाचा स्पर्श असला तरी हे आत्मकथन नाही. मानहानी, नकार, उपेक्षा नाकारणारी अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी सशक्त स्त्री हया ग़ज़लांमधून डोकावते आहे, जी स्त्री जीवनाचा आलेख उंचावते. ही स्त्री आसवांचे सामर्थ्य जाणते-

**सामर्थ्य आसवांनी आम्हा दिले असे की**

**उद्दाम बादलांना जिंकून आज आलो ।।**

स्त्री मनात प्रचंड आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या ह्या गज़ला आहेत. पराभव न स्वीकारणारी ही स्त्री म्हणते-

**काट्यांमधे फुलांची सजवीत वाट आले**

**रक्ताळले तरी मी मिरवीत थाट आले।।**

निरपराधांचा, निष्पापाचा कैवार घेणारी ही स्त्री म्हणते-

**मोठेपणा जपाया मज राम आठवेना**

**अश्राप भूमीकन्या पोटात घेतल्या मी ।।**

ही समर्थ स्त्री निर्भिडपणे पुरुषाला सांगते-

**माझे जिणे तू जगू दे मला ही**

**नाते जगाशी जपू दे मला ही**

**मागे पुढे तू असावेस का रे**

**अस्तित्व माझे कळूदे मला ही।।**

डांबून ठेवणाऱ्या संस्कारांविरुद्ध व्यवस्थेविरुद्ध जाणाऱ्या ह्या स्त्रीने संस्कारांचे अनोखे सामर्थ्य जाणले आहे. सामान्यपणे काजळरेषा डोळ्यांना सुंदर बनवते. पण ही स्त्री म्हणते-

**डोळयात काजळाची ओढून एक रेषा**

**काळोख छेदण्याचा आम्ही सराव केला ।।**

काळोख छेदणारी ही स्त्री तितकीच वत्सल आहे, स्नेहमयी आहे, करुणार्द्र आहे. ती म्हणते-

**आम्हास वर्ज्य आहे तो देवलोक मोठा**

**घरकूल राखण्याचा आम्ही सराव केला**

**बाधा जगी कुणाला होऊ नये विषाची**

**पीयूष पाजण्याचा आम्ही सराव केला ।।**

पीयूष पाजणारी अशी ही पीयुषी, तिच्या प्रतिकारात स्वत्वतेज आहे. सीतेने रामाला प्रत्युत्तर न देता वनवास पत्करला. पण लव-कुशाला इतके पराक्रमी बनविले की रामाचा अश्वमेध यज्ञाचा अश्व त्यांनी अडविला. राम-लक्ष्मणाशी युद्ध केले. सीतेसारखे प्रदीप्त प्रत्युत्तर देणारी स्त्री या संग्रहातून साकारण्याचा प्रयत्न आशा पांडेंनी केला आहे. अशी विलक्षण प्रतिभावान, सामर्थ्यवान स्त्री गज़लेच्या माध्यमातून पहिल्यांदाच आपल्याला भेटते. ती स्त्रीवादी संकल्पनांच्या चौकटीत बसत नाही. म्हणून ती स्वीकारली जात नाही. गज़लांना साहित्यिक मूल्य आहेच. त्याहीपेक्षा मोलाने जीवनमूल्य आहे. ह्या संग्रहासंबंधी मराठी साहित्य परिषद नाशिकतर्फे २००० सालीच्याच दिवाळी अंकात सुरेख अभिप्राय आहे.

'स्त्री जीवनाच्या व्यथा सांगणाऱ्या ह्या गज़ला

(गझला) स्त्रीला सशक्त व नवनिर्माण करणारी बनवितात. तिच्यातला आत्मविश्वास फुलवतात व तिची आसवे उद्दाम वादळाला जिंकू शकतात असा एक ठाम विश्वास देतात. गणवृत्तात लिहिलेल्या ह्या सर्व गझला अतिशय मधुर हळुवार, गेय व निर्दोष आहेत. शब्दांची अप्रतिम बांधणी लक्षणीय आहे. समाजाला समजून घेण्याची प्रगल्भता असल्याने भाषेला वेगळीच उंची व सुरावट आहे."

प्रगल्भ स्त्रीमनाने गझलेतून मांडलेला स्त्रीजीवनाचा हा पहिलाच आलेख आहे. हा संग्रह महाराष्ट्रातला पहिला गज़ल संग्रह ठरलाच आहे पण हा स्त्री जीवनाचा अशा प्रकारचा हा आलेख ही पहिलाच असावा हे विशेष. हया दमदार निर्मितीसाठी कवयित्रीचे अभिनंदन.

# आषाढाच्या पहिल्या दिवशी..!

## सायली देशपांडे

**“जयन्ति ते सुकृतिनः रससिद्धाः कवीश्वराः |**

**नास्ति येषां यशः काये जरामरणजं भयम् ||”**

कालिदासासारख्या रससिद्ध कवीश्वराच्या यशरुपी शरीरास जरामरणाचं भय स्पर्शही करु शकत नाही. यावच्चंद्रदिवाकरौ कालिदासाचं यश या विश्वाला आनंद देत राहील यात शंका नाही. ग्रीष्म ऋतु संपला की मनाला चाहुल लागते ती आषाढाची. या आषाढ महिन्याची सुरुवातच मुळी संस्कृत कविकुलगुरु कालिदास दिन यानी होते. कवी जर रससिद्ध असेल तर त्याचं काव्य रसपूर्ण होईलच या न्यायाला कालिदासांचं मेघदूत कसं अपवाद असेल?

कालिदास या नावाबरोबरच अनेक आख्यायिका अनेक तर्क पहिले पासूनच जोडलेले आहेत असे दिसून येते.

कालिदास नेमके कोणत्या प्रांतातील आहेत यावर अद्यापही एकमत नाही. त्यांच्या नावावरुन त्यांना कोणी बंगाली म्हणतात तर विक्रमादित्यांच्या दरबारी असल्यामुळे कोणी त्यांना उज्जयिनीचे समजतात. मेघदूत या खंडकाव्याच्या निर्मितीमुळे कोणी त्यांना विदर्भ देशाचे समजतात तर कोणी त्यांना काश्मिरी समजतात.

तसे बघितले तर एक तर्क इथे यथार्थ ठरतो तो असा की, चंद्रगुप्त विक्रमादित्यांची मुलगी प्रभावती गुप्ता, ही वाकाटकनरेश रुद्रसेनाची पत्नी. रुद्रसेनच्या मृत्युनंतर बालवयीन प्रवरसेन नामक तिच्या मुलाच्या शिक्षणासाठी चंद्रगुप्ताने काही शिक्षक मंडळी पाठविली आणि त्यानंतर परिस्थिती पाहण्यासाठी म्हणून कालिदासांना पाठवले त्यावेळी वाकाटकांची राजधानी होती नंदिवर्धन. म्हणजेच आजचे नगरधन. तिथून रामटेक अर्थात रामगिरी अतिशय जवळ. कालिदास नेमके कुठले यावर जरी अजूनही एकमत नसले तरीही ते हिंदुस्थानचे हे मात्र नक्की. हे ही नसे थोडके !!

महाकवी कालिदासांच्या सप्तकलाकृती सर्वश्रुत आहेत. पण त्यातली अत्यंत अजरामर

ठरलेली सर्वोत्तम कलाकृती म्हणजे “मेघदूतम्” या खंडकाव्याने रसिक मनावर घातलेली मोहिनी आजतागायत कायम आहे आणि पुढे येणाऱ्या काळात सुद्धा ही अशीच असेल यात तिळमात्र शंका नाही. आषाढ आणि मेघदूत हे समीकरण आजही तसेच आहे. संस्कृत भाषेत अनेक कवी होऊन गेले मात्र कालिदास हे नाव या समीकरणात उच्चस्थानी आहे हे मात्र निर्विवाद सत्य.

**“पुरा कवीनां गणनाप्रसंगे**
**कनिष्ठिकाधिष्ठितकालिदासः |**
**अद्याऽपि ततुल्यकवेरभावादनामिका**
**साऽर्थवती बभूव ||”**

पूर्वी कवींचे मोजमाप करत असतांना स्वाभाविक प्रथम बोटावर (कनिष्ठिकेवर) महाकवी कालिदासांचे नाव घेतले गेले पण पुढे काय? त्यापेक्षा मोठ्या बोटावर त्यांच्यापेक्षा मोठे नाव हवे परंतु ते आजवर मिळालेच नाही. त्यामुळे दुसरे बोट ‘अ-नामिका’ च राहिले. ही महाकवींची सर्वोच्चता. मेघदूत या खंडकाव्याशिवाय इतर सहा कलाकृती सुद्धा तितक्याच महत्वपूर्ण आणि अप्रतिम आहेत. “रघुवंशम्” आणि “कुमारसंभवम्” या दोन महाकाव्यांचा समावेश तर संस्कृतातल्या पंचमहाकाव्यांमध्ये होतो. तसेच “ अभिज्ञान शान्कुन्तलम्” “ विक्रमोर्वशीयम्” आणि “मालविकाग्निमित्रम्” ही तीन नाटकं आणि “ ऋतुसंहारम्” हे खंडकाव्य कालिदासांच्या नावे आहे.

उपरोक्त कुठलीही कलाकृती आपण वाचली तरी केवळ आणि केवळ आनंदच त्यातून प्राप्त होतो. कथावस्तू अत्यंत सध्या पण त्या खुलवण्याची प्रतिभा, कल्पनाविलास, शब्दरचना, अलंकारांचा समर्पक उपयोग, सूक्ष्मव्यक्तिचित्रण ही त्यांच्या लिखाणाची मर्मस्थानं आहेत. अर्थात त्यांच्या लिखाणावर बोलण्याइतकी आपली योग्यता नाही परंतु ही मर्मस्थानं आपल्याला आणि आपल्या विचारांना स्तिमित करतात हे मात्र खरं. संस्कृत विषय स्नातक आणि स्नातकोत्तर घेणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा आस्वाद नक्कीच घेता येतो पण त्याशिवाय इतर कोणी या कलाकृतींकडे वळत नाही हे बघून वाईट वाटते. बरेचदा भाषा कठीण आणि क्लिष्ट म्हणून आपण याकडे दुर्लक्ष करतो परंतु अशा अनेक सुंदर कल्पनाविलास आणि लेखनशैलीकडे आपण पाठ फिरवतो असं मला व्यक्तिशः वाटतं. आषाढ महिना आला की फक्त कालिदास आठवतात त्यांचं मेघदूत आठवतं हे आनंददायीच आहे परंतु याशिवाय जर आपण याकडे अभ्यासापेक्षा एक रसिक म्हणून वळलो तर कदाचित आपल्याच विचारांना सौंदर्य प्राप्त होईल.

कालिदास आणि कालिदासांचं साहित्य हा भाग लिहिण्यापेक्षा अनुभवण्याचा भाग आहे. तेव्हा हा कालिदास दिन तेव्हाच खऱ्या अर्थाने सफल होईल जेव्हा समग्र कालिदास आणि त्यांचं साहित्य प्रत्येक जण संग्रही ठेवेल त्याचा अभ्यास करेल आणि आनंद घेईल त्याचबरोबर तो आनंद इतरांमध्ये वाटल्या जाईल. अशा या महाकवीला त्रिवार वंदन. तेव्हा या शब्दांजलीसह माझ्या लेखणीला विराम देते.

# दुहिता

प्राजक्ता बर्वे

तसा बहुत विशाल आणि कठोर डोंगर |
तरी सुध्दा तया असे थोडी प्रेमाची झालर ||
त्याच्या हृदयाचा ठोका कशी पहा चुकवते |
उधळत खिदळत नदी उदयास येते ||१||

नदी असे किती द्वाड आणि किती खोडकर |
तिच्या लीला पाहताना भरे बापाचा त्या उर ||
नाचू-गाऊन आनंदे, नदी आनंदे खेळते |
नदी बालपण कैसे पूर्ण जगूनिया घेते ||२||

वय वाढले जरासे नदी मोठी जरा झाली |
तिला वाटले की आता तिने जावे थोडे खाली ||
कठोरश्या कुशीतून नदी पुढे सरकते |
डोंगराच्या मनामधे तेव्हा कसेनुसे होते ||३||

चहूकडे हिरवळ आणि फुले फुललेली |
मंद वाऱ्याच्या वेगाने नदी फार सुखावली ||
नवे रंगीतसे जग तिला आवडू लागते |
डोंगराच्या हृदयात एकाकीपण उरते ||४||

झाले फिरुनिया छान खूप झाले बागडणे |
आता उद्दिष्ट नदीचे फक्त स्थैर्यास गाठणे ||
शांत होऊनिया नदी उदधीस त्या स्मरते |
दूरवर डोंगराला जरा हायसे वाटते ||५||


लख्ख आठवले आता तिला तिचे उंडारणे |
अन् बापास एकटे लांब सोडूनिया येणे ||
तरी बघा कशी आता नदी पुढेच चालते |
पण मनातून डोंगराची माफीही मागते ||६||

वेस ओलांडून नदी आली हळूच सासरी |
नाही उरली काळजी आता डोंगरा माहेरी ||
गृहप्रवेश करून नदी सागरा भेटते |
तरी सुध्दा तिला कुशी बापाचीच आठवते ||७||

# भेटी लागे जीवा

स्नेहा जोशी

अवघ्या विश्वाला शांततेचा संदेश देऊन वयाच्या सोळाव्या वर्षी पसायदान लिहिणारे आमचे ज्ञानेश्वर महाराज खरोखरी त्रिलोकी महान! आजकाल ज्या वयात मुलांना स्वतःची जबाबदारी कळत नाही, कळाली तरी स्वार्थाचा वास ज्याला चिकटलेला असतो,त्या वयात माऊलींनी जगासाठी पसायदान मागितले. “जो जे वांछिल, तो ते लाहो, प्राणिजात” हे एक वाक्य मला तरी खूप आवडतं. अवघ्या जगातील प्राणिमात्रांना जे जे हवं ते ते मिळू देत.अशी आर्त विनवणी पांडुरंगाला ज्ञानेश्वरांनी केली.




हे पसायदान त्या लोकांसाठीही होतं, ज्या लोकांनी ज्ञानेश्वरांना, त्यांच्या परिवाराला अतोनात त्रास दिला, कष्ट दिले. आजच्या काळात जगताना आपण खरं असा विचार करु शकतो का? असा मला नेहमी प्रश्न पडतो. छोट्या मोठ्या गोष्टींमुळे एकमेकांवर रुसणारे,फुगणारे आपण, एवढ्या वैश्विक विचाराच्या पातळीवर येऊच शकत नाही. नाहीतर आजकालच्या काळात सख्ख्या नात्यांमध्ये कटुता येते,तर जगाचा विचार कोण करतं?

भावनांची कुठल्याही प्रकारे गुंतागुंत होऊ न देता सुद्धा, तितक्याचं आर्ततेने जगासाठी प्रार्थना करणारे ज्ञानेश्वर महाराज पाहिले की, आपल्यातला थिटेपणा, खोटारडेपणा मला जास्त जाणवायला लागतो. समाजात वावरताना आपण सहसा सगळ्यांशीच हसून खेळून वागतो, बोलतो. ज्या माणसाकडे आपला स्वार्थ, तिथे तर जास्तचं साखरपेरणी होते, हा मनुष्यधर्मच. पण मागाहून आपण स्वतःची, कुटुंबाची

सोडली,तर कुणाशी आस्था बाळगतो का? “हे विश्वची माझे घर” असं म्हणणारी पिढी,लोकं,केव्हाच काळाच्या पोटात गुडुप झाले. आपण सध्या चालवतो ते केवळ आणि केवळ भ्रमांचे भोपळे. फेकत राहतो धूळ समोरच्याच्या आणि स्वतःच्याही डोळ्यांत. ज्ञानेश्वरांइतकं मोठ्ठ मन आपल्याकडे नाही.ना सहनशक्ती. त्यांनी दाखवलेला दयाभाव तर मुळीच नाही.

कोरोनाच्या वैश्विक महामारीतही "तो" ज्या पद्धतीने स्थितप्रज्ञ उभा ठाकला होता त्या विटेवर, त्याच किंवा त्याहीपेक्षा जास्त आर्ततेने तो भोळा आणि खराखुरा भाव अजूनही शोधत असावा, हे नक्की. देखलेपणा आणि नाटकीपणा त्याला नकोच आहे.आताच्या काळातही पायीवारीचं मॉडर्न विडंबन त्याला खऱ्या अर्थाने नकोय. त्याला मनमोकळा भाव हवाय, निःस्वार्थी भाव हवाय.  नाही तर आपल्याचं भक्तांचं, लेकरांचं कठोर परिक्षण करण्याएवढा तो विठ्ठल नक्कीचं निष्ठुर नाही. आपण मात्र झाडून सगळ्यांची वाट लावायचीचं, असं ठरवलं तर तो सुद्धा कितपत सहन करणार? या सगळ्याला अंत आणि सहनशक्ती त्यालाही आहेच की!

त्यामुळे आताच्या काळात पायीवारीला गेल्यानंतरही विठुराया तेवढ्याच आत्मीयतेने आम्हांला भेटेल की नाही, हे सांगता येत नाही. कदाचित, डोळे मिटुन तोच ज्ञानेश्वरांकडे गाऱ्हाणं घालत असेल, की, “बाबा रे, जे जे हवं ते ते मी सगळ्यांना सगळं देतो, तुझ्यातलं निस्सीम प्रेम, भक्ती, सहवासाची भूक, त्याग, उभ्या विश्वाचा कळवळा, सहानुभुती आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे समर्पण जर कुण्या एकाच्याही ठायी असेल तर मला त्याची गळाभेट घालून दे. गेली अठ्ठावीस युगं मी त्याच शोधापायी उभा ठाकलोय आणि असा एक जरी निस्वार्थ अवलिया मला भेटला, तर "येणे वरिये ज्ञानदेवो सुखिया झाला", या ऐवजी "येणे वरिये विठुराया सुखी जाहला" हे जास्त सार्थ ठरेल!

# तीर्थरूप

## मैथिली अंजनकर



पिता हा शब्द संस्कृतमधील “पा रक्षणे” या धातुपासून निष्पन्न झाला आहे. याचा अर्थ असा आहे, **“य: पाति स पिता”** अर्थात जो रक्षण करतो तो पिता असतो .

संस्कृत साहित्यामध्ये पित्याचा गौरव केलेला दिसून येतो  पपुराणात म्हटल्या गेले आहे की –

**“सर्वतीर्थमयी माता सर्वदेवमय: पिता |**
**मातरं पितरं तस्मात् सर्वयत्नेन पूजयेत्||”**

माता सर्व तीर्थमयी आणि पिता संपूर्ण देवतांचे स्वरुप आहे. यासाठीच सर्वप्रकाराने यत्नपूर्वक माता -पित्याचे पूजन करावे. जे माता – पित्याला प्रदक्षिणा घालतात त्यांची सातद्वीपांनी युक्त पृथ्वीची परिक्रमा होते.

पुढे म्हटल्या गेले आहे –

**“पिता धर्म: पिता स्वर्ग: पिता हि परम तप: | पितरि प्रीतिमापन्ने प्रीयन्ते सर्वदेवता:||”**

पिता धर्म आहे, पिता स्वर्ग आहे आणि पिताच सर्वश्रेष्ठ तप आहे. पिता प्रसन्न झाल्यावर संपूर्ण देवता प्रसन्न होतात.

सलील कुलकर्णी आपल्या एका गाण्यात म्हणतात –

**आटपाट नगरात गर्दी होती भारी**
**घामाघुम राजा करी लोकलची वारी**

**रोज सकाळीच राजा निघताना बोले**
**गोष्ट सांगायचे काल राहुनिया गेले**
**जमलेच नाही काल येणे मला जरी**
**आज परी येणार मी वेळेतच घरी**
**स्वप्नातल्या गावामध्ये मारु मग फ़ेरी**
**खऱ्याखुरा परी साठी गोष्टीतली परी**
**बांधीन मी थकलेल्या हातांचा झुला**
**दमलेल्या बाबांची ही कहाणी तुला**

"दमलेल्या बाबांची कहाणी" या गाण्याचा नीटसा अर्थही मला ज्या वयात कळत नव्हता तेव्हा बाबांनी मला संदीप खरे आणि सलील कुलकर्णी यांच्या कार्यक्रमाला नेले. हा एकच नाही तर अशा अनेक कार्यक्रमांमध्ये बाबांनी मला सोबत नेले यात मोरुची मावशी हे नाटक, पती गेले ग काठेवाडी, चोराला भेटला पांडुरंग इ. नाटके आम्ही सोबत पाहिली. केवळ नाटके नव्हे तर अनेक सांगितिक कार्यक्रम, साहित्यिक कार्यक्रम, व्याख्याने, एवढेच नव्हे तर सायंटीफिक हॉलमध्ये दंढारी-तमाशेही सोबतीने पाहिले. श्वास, काकस्पर्श, मी शिवाजीराजे भोसले बोलतोय, स्लमडॉग मिलेनीयर असे अनेक चित्रपटसुद्धा. कधी - कधी मला एकटीला घेऊन बाबा चित्रपटाला जायचे.

माझे बाबा हे केवळ माझे बाबाच नाही तर खूप जवळचे मित्र, सल्लागार आणि एखाद्या परीसारखे मला जपणारे आहेत. आतापर्यंत मला जी गोष्ट हवी ती किंवा ज्या गोष्टीकडे दुकानात मी बोट दाखवलं आणि ती मला घेऊन दिली नाही असे कधीच झाले नाही. मी जे -जे मागितले ते-ते त्यांनी मला दिलेच.

कुटुंब आणि शाळा अशा दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी प्रसंगी शाळेला महत्त्व दिलं आहे. मला आठवतं, मी लहान असताना "ज्योती" या हस्तलिखिताचे काम बाबांकडे असायचे तेव्हा बाबा रात्री-जागून आपल्या मोत्यासारख्या अक्षरांनी पूर्ण ते करायचे. दोन्हीही गोष्टी जर एकत्र आल्या कुटुंबातील एखादी गोष्ट आणि शाळेतली, तर बाबांनी शाळेला प्रथम प्राधान्य दिलं आहे. शाळा आणि त्यांच्या नात्यात इतक्या वर्षात एक घट्ट असं ऋणानुबंधाचं नातं निर्माण झालेलं आहे.

बाबांकडून मी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असंख्य गोष्टी शिकली किंवा शिकते आहे. मग ते लिखाण असो की स्वयंपाक असो. आईने तर मला स्वयंपाकातील अनेक गोष्टी शिकविल्याच पण वेगवेगळ्या भाज्या, पिठलं, झुणका, लाडु आणि चिवडयापासून थेट पुरणपोळी करायलाही मला बाबांनी मला शिकवले.

प्रत्येक वेळी कोणत्याही स्पर्धेची तयारी करताना माझे पहिले परीक्षक माझे बाबाचं असतात. एकपात्री प्रयोगाची आवडही त्यांच्याकडूनच मला मिळालेली आहे. अभिनयातील बारकावे, त्यांच्याकडून मी जाणून घेतले आहेत. भाषण, वक्तृत्व स्पर्धा यांचे प्रथम परीक्षक बाबाच. स्वयंपाक केल्यावरही त्यात कमी -जास्त काय असावं हे देखील मला ते नीट समजून सांगतात. नाटकातील संस्कार लहानपणापासूनच माझ्यावर असल्यामुळे माझा Ph.D चा विषयही मी “आधुनिक संस्कृत नाटकामधील आहार्य अभिनय” हाच घेतला आहे, या विषयाची प्रेरणा मला बाबांकडूनच मिळाली.

वाचनाची आवड मला त्यांच्याकडूनच मिळाली. दिवाळी आली की दिवाळीच्या फराळासोबतच आमच्या घरी दिवाळी अंकाची देखील रेलचेल असते. दिवाळी अंक म्हणजे आमच्या सर्वांसाठी मेजवानीच .प्रत्येक अंकात बाबांचं लिखाण पाठवणे, त्यांची वर्गवारी करणे म्हणजे आमच्या सर्वांसाठी जणू सोहळाच. प्रत्येक वर्षी दिवाळी आली की शंभर सव्वाशे दिवाळी अंक पोस्टाने घरी यायचे. त्यातल्या ज्या पानावर बाबांचं साहित्य छापलेलं असायचं त्यात मी आडपाने घालायचे.

कोणतेही काम करताना बाबा ते अगदी एकाग्रतेने करतात. केवळ तनाने नव्हे तर मनाने देखील ते त्यात समरस होतात .त्यांची लेखनतंद्री मी लहानपणापासून पाहत आले आहे. लिहताना ते आम्हाला काही वाचू देत नाही. ते पूर्ण झाल्यावर वाचावे असे ते म्हणतात. माझ्या बालपणी जेव्हा त्यांच्या कार्यात ते मग्न असत तेव्हा मी त्यांना काहीही सांगितलं तर ते न पाहता “छान आहे”, “छान आहे” असे म्हणायचे .

भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य आणि निर्णय स्वातंत्र्य हे तीनही प्रकारचे स्वातंत्र्य बाबांनी आम्हाला दिले . मला दहावीत उत्तम गुण प्राप्त झाल्यानंतर मला कला शाखेकडेच (Art’s) कडे जायचं होते तेव्हा बाबांनी मला पाठिंबा दिला आणि मी या शाखेकडे वळली. बऱ्याच लोकांनी तिला सायन्सलाच पाठवा असा सल्ला दिला पण बाबा मला म्हणाले, “तुला मनापासून जे आवडेल ते तू कर.” आणि मी Art’s ( कला ) शाखेचा स्वीकार केला आणि आता Ph.D. चा प्रवास सुरु आहे. बाबा मला नेहमीच प्रोत्साहन देतात. त्यांनी परकीय भाषा शिकण्यासाठी मला प्रोत्साहन दिले. म्हणूनच मी जर्मन भाषा, संस्कृत भाषा, प्राकृत भाषा अशा वेगवेगळ्या ६ भाषा शिकू शकले. हे त्यांच्या प्रोत्साहानामुळेच शक्य झाले. समाजात जेव्हा बरीच मुले डॉक्टर

इंजिनियर या क्षेत्राकडे वळत होते तेव्हा माझ्या कला शाखेकडे वळण्याच्या धाडसी निर्णयाला त्यांनी पुरेपुर पाठिंबा दिला.

कोणतेही काम करताना ते अगदी निरपेक्षपणेच करावे ही शिकवण ते आम्हाला सतत देत असतात. कोणाकडून कशाची अपेक्षा ठेवायची नाही असे म्हणतात. आपल्या एखादया कृतीने जर समोरच्याला आनंद होत असेल तर ती का करु नये ? असे ते नेहमी म्हणतात. माझ्या आईची वाचनाची आवड पाहून बाबांनी तिला Ph.D. करण्यासाठी दिलेल्या प्रोत्साहनामुळे आणि आईच्या मेहनतीमुळे आईला Ph.D. प्राप्त झाली. पण केवळ आईची आवड म्हणून बाबांनी तिला Ph.D. करु दिले अशी आहे माझ्या बाबांची निरपेक्षता. आई घरची होती म्हणूनच नाही तर कोणालाही ते अगदी सहजतेने मार्गदर्शन करतात. लिहून देतात आणि लिहिल्यावर ते समाजाचे झाले असेच म्हणतात. लेखक फक्त लिहिण्यापुरता आणि ते शब्दधन समाजानेच आपल्याला दिले. ती रचना पूर्ण झाली की तिचा मालकीहक्क समाजाचा असे त्यांना वाटते

व्याख्यानाची कुठलीही निंमत्रणे आली तरी आता पहिल्याच फोनवर तर पूर्वी नुसत्या पत्रावर ते होकार दयायचे. ते व्याख्यान कितीही लांबच्या शहरात असो ते ओढाताण करून जातील आणि येतील. कुणी मानधन विचारले तर 'तसे काही नाही' असेच यांचे उत्तर.

स्त्री-पुरुष समानतेबदल जे आता समाजात बोलले जाते ते आमच्या घरी गेल्या कित्येक वर्षांपासूनचा अंमलात आणल्या जाते. अमुक एक काम पुरुषाचे किंवा तमुक एक काम स्त्रीचे असे कधीच नसते याचा मला फार आनंद आहे. कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य जितकं त्यांना तितकेच ते माझ्या आईलादेखील आहे. माझे बाबा जे बोलतात तेच ते अंमलात देखील आणतात. वैचारिक स्वातंत्र्य देखील आम्हाला देतात. बोलायचं एक आणि करायचे दुसरचं हे त्यांनी कधीच केले नाही. अवंती भोयर आपल्या कवितेत बाबांविषयी व्यक्त होताना म्हणतात,

**बाबा म्हणजे, कधी क्रोधाचा गजर**

**तर कधी प्रेमाची आस**

**कधी मायेचा पदर**

**तर कधी ममतेची कास.**

पुढे त्या म्हणतात-

**बाबा, कधी बरसणारा पाऊस**

**तर कधी फुललेला मळा**

**कधी सोसाट्याचा वारा**

**तर कधी शंकर भोळा.**

किती समर्पक ओळी आहेत या!  माझ्या बाबांवर माझ्या आजीचे संस्कार आहेत. माझी आजी एक उत्तम शिक्षिका म्हणून सेवानिवृत्त झाली आहे. त्यामुळे आमच्या घरी कोणत्याही विषयावर तीन पिढ्या एकत्र बसून चर्चा होते. याचा मला खूप आनंद आहे.

बाबांचा मित्रसमुदाय फार मोठा आहे. त्यात मैत्रिणींचीही संख्या लक्षणीय आहे. साहित्यिक, पत्रकार, चित्रकार काष्ठशिल्पी आणि अनेक प्राध्यापक शिक्षक वगैरे ! आमच्या कुटूंबामध्ये जेव्हा दोन मित्रपरिवार एकत्र येतात तेव्हा होणारा आनंद अवर्णनीयच असतो. या सर्वांशी आम्हा कुटुंबीयांचे जिव्हाळ्याचे स्नेहबंध आहेत, त्यांच्या कुठल्या कुठल्या मानलेल्या बहिणी त्यांना नित्यमानाने रक्षाबंधनाला राख्या पाठवतात. कार्यक्रमांच्या निमित्ताने त्यांनी अनेक गावातील अनेक घरे आपली केली आहेत.

बाबांच्या पत्रसंग्रहात कुसुमाग्रज, बा.भ. बोरकर ,शांता शेळके, आनंद यादव, श्रीराम गुंदेकर, अजीम नवाज राही, रजिया सुलताना, शंकर विटणकर, कृष्णा चौधरी, श्रीकृष्णा बेडेकर, भास्कर चंदनशिव इ. साहित्यिकांची उत्तमोत्तम पत्रे आहेत. त्यांच्या अनेक मित्रांची पुस्तके शालेय तथा विद्यापीठीय अभ्यासक्रमात लागली आहेत.  याचा त्यांना आनंद वाटतो. पण आपले साहित्य लागण्यासाठी ते कधीही प्रयत्नशील नसतात.

पत्रं लिहिणे, चित्रे काढणे, शुभेच्छापत्रे तयार करणे आणि झाडे लावणे हे त्यांचे छंद... बाजारात जाणे, आवडीने विभिन्न पदार्थ बनविणे आणि अखंड वाचन आणि लेखन करणे त्यांना आवडते. “मला करमत नाही. मी बोअर झालो” हे विधान मी त्यांच्याकडून ऐकले नाही. कोविडच्या काळात त्यांनी भरपूर वाचले आणि खूप लेखन केले आहे. मला “प्रसिद्धीपेक्षा सिद्धीकडे लक्ष दे” असे त्यांचे सांगणे आहे, साहित्यिक वर्तुळात, आकाशवाणी केंद्र तथा दूरदर्शन केंद्र वा वृत्तपत्रांच्या कचेऱ्यात त्यांच्या ओळखीचे आणि मैत्रीतले अनेकजण असूनही त्यांच्या नावाच्या आधारे मी काही प्रसिद्ध वा प्रसारित करणे त्यांना आवडत नाही. मी माझ्या परीने पुढे जाण्याचा स्वतंत्र प्रयत्न चालविते आहे.

शेवटी इतकीच इच्छा प्रकट करते की, आतापर्यंत बाबांचे जे काही साहित्य अप्रकाशित आहे ते लवकरात लवकर प्रकाशित व्हावे हीच सदिच्छा.

# आनंदाचे डोही आनंद तरंग

मृणमयी सारंग

वारी म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर येतं ते अवघ्या महाराष्ट्राचं माहेर, "पंढरपूर", कर कटावरी ठेऊन विटेवर उभे असलेले "सुंदर ते ध्यान" आणि जिच्याशिवाय वैकुंठाचा कारभार चालत नाही अशी आपली "रखुमाई".

विठ्ठुचा गजर करीत असंख्य वारकरी संसाराची,भौतिक सुखांची, ऊनपावसाची तमा न बाळगता "माझा भाव तुझे चरणी" अशा बेभान,उन्मनी अवस्थेसह, अठ्ठावीस युगे जो आपल्या भक्तांसाठी विटेवर उभा आहे आणि ज्याच्या एका दर्शनासाठी लाखो वारकरी तहान भूक विसरून ओठी त्याचे नाम आणि मनात त्याचे रूप साठवून कितीतरी योजने हरिनामाचा जप ,गजर करीत चालत असतात. वारी म्हणजे ह्या दोघांच्या मिलनाचा सोहळा.

एक भक्तांसाठी भुकेला आहे तर दुसरा दर्शनासाठी. ह्या दोघांची तहान भागते ती चंद्रभागेच्या तीरी. ज्याचा साक्षीदार असतो पुंडलिक. ह्या वारीत कोणी लहान नसतं कोणी मोठं नसतं कोणी देव नसतो कोणी भक्त नसतो असते ती फक्त भेटीची आस आणि निव्वळ भक्तीने ओतप्रोत भरलेलं मन. दर्शन घेणारा विठ्ठलच असतो आणि दर्शन देणाराही. साऱ्या जगाचा बाप आपल्या लेकरांवर माऊली सारखं एका आईसारखं प्रेम करतांना आपल्याला दिसतो. भक्तांनी गजबजलेली ती पंढरी स्वर्गातूनही श्रेष्ठ होऊन जाते.

अनेक संतांच्या पालखी इथे येऊन आनंदाला नवीन उत्साह देतात. नामजप, पायीवारी, अश्व रिंगण, टाळ मृदुंगाच्या तालावर चालणारं ते नृत्य सगळंच अद्भुत असतं. कोणाची कोणाशी तुलना नाही,कुठेच कसला मानपान नाही, काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर अश्या कुठल्याच गोष्टीला इथे स्थान नसते, असते ते फक्त प्रेम, माया, आनंद, त्या परमेश्वरात "एकतारी संगे एकरूप" होण्याची इच्छा. इथली प्रत्येक व्यक्ती जणू त्या ईश्वराची एकेक सर्वोत्तम अशी कलाकृतीच जिच्यात साक्षात तोच वास करतो.

अशी ही आनंदयात्रा आषाढ आणि कार्तिक ह्या दोन महिन्यात आपल्याला अनुभवायला मिळते. उत्तम नियोजन, सर्वसमावेशक भाव, नवविध भक्तीचे उत्तम उदाहरण, सर्वत्र फक्त आणि फक्त आनंद तरंग म्हणजे आपली ही वारी. वारी ही बघायची नसते ती अनुभवायची असते, जगायची असते. श्वासाच्या प्रत्येक आवर्तनासोबत ती स्वतःत भिनवून घ्यायची असते आणि "हेची दान देगा देवा" म्हणत विठ्ठलाला साकडे घालायचे असते. महाराष्ट्राची ओळख असलेली ही पंढरीची शिस्तबध्द वारी आता अनेकांच्या संशोधनाचा, पी.एच.डी. चा विषय झाली आहे. ही एक अभिमानाची गोष्ट आहे. वारीला एक सांस्कृतिक आध्यात्मिक महत्व प्राप्त झाले आहे त्यामुळे महाराष्ट्राची एक गौरवशाली संतपरंपरा अधोरेखित होत आहे हेही नसे थोडके...!

“रामकृष्ण हरि”

# राजयोगिनी :अहिल्याबाई होळकर

## डॉ. सोनाली गायकवाड

रोजच्याच रस्त्याने जात असताना गेल्या काही दिवसात तोंडात बसलेला 'काटे कुटेच भरले तव ध्येय पंथी', हा श्लोक मनात सुरूच होता आणि अजनीच्या त्या पुलावर गर्दीत सापडलीच. इंचभरही गाडी पुढे जाईना. इकडे कॉलेजला पोहचायला वेळ होतोय आणि इकडे ही गर्दी, नुसता मनस्ताप आणि मनात आलं हा श्लोक "गाड्या गुड्याच फसल्या तव मार्गपंथी" असा करायला हवा. या विचारात कशी-बशी पूल पार करून बाहेर आली तर समोरच्या रस्त्याला नाव दिसलं मोठ्या अक्षरात 'अहिल्या बाई होळकर मार्ग'.



छाती अभिमानानी भरून आली. वा! काय छान काम, असं वाटून गेलं. पुढे येणाऱ्या भव्य रस्त्याला दिलेलं हे नावं योग्यच आहे. एवढाशा गर्दीने त्रासणारे आपण कुठे आणि ज्या स्त्रीने तिच्या आयुष्याचा मार्ग खरोखरीच काट्या कुट्यातून काढला ती स्त्री कुठे याची जाणीव झाली. त्या स्त्रीचा जीवनपट समोर झळकू लागला.

असे अनेक रस्ते, घाट मंदिरं बांधणाऱ्या परकोटीची समाजसेवा, देश सेवा करणाऱ्या स्त्रीचा मार्ग इतका खडतर असावा!

वयाच्या बाराव्या वर्षी महादेवाची वाळूची पिंड उधळून जाऊ नये म्हणून त्यावर आडव्या होणाऱ्या अहिल्येला, श्रीमंत पेशव्यांनी "असं का केलंस? भीती नाही का वाटली भरधाव येणाऱ्या घोड्याची?" असं

विचारलं तेव्हा, “जे आपण निर्माण केलंय, जे आपलं आहे ते जपायला नको का?” असा प्रश्न विचारून उत्तर दिलं आणि पेशव्यांसोबत असलेल्या मल्हारराव होळकरांनी तिच्यातली तेजस्वी करारी राज्यकर्ती ओळखूनच तिला त्यांची सून केली असावी ह्यात शंकाच नाही. अहिल्या माणकोजी शिंदे, लग्नानंतर अहिल्या खंडोजी होळकर झाली. संसार वेलीवर दोन फुलं फुलली, थोरला मालेराव, धाकटी मुक्ताबाई. वेलीला फुलं आली पण संसार वेल हवी तशी बहरली मात्र नाही. खंडेराव होळकरांची पत्नी म्हणून हवं ते सुख समाधान कधी लाभलंच नाही त्या देवीला.

वाममार्गाला लागलेल्या पतीचं अल्पवधीतच निधन झालं. निधनानंतर सती जाणाऱ्या अहिल्येला मल्हाररावांनी थांबवलं आणि राज्यकारभार सोपवला. डोळ्या देखत खंडेरावांच्या इतर बायकांना सती जाताना बघताना जीवाची होणारी घालमेल त्यांची त्यांनाच ठाऊक. स्वतःच दुःख बाजूला सारून या खंबीर अहिल्येने अनेकांची घर सावरली. पती निधनानंतर मुलीचा विवाह कर्तबगार यशवंतराव फणसेशी लावून दिला पण ते जावई देखील अल्पायुषी ठरले. अवघ्या तीस वर्षांच्या आयुष्यानंतर त्यांचे देहावसान झाले आणि त्यांच्या पाठोपाठ मुलीने ही सती जाण्याचा निर्णय घेतला. मुलगा असून नसल्या सारखाच.वडिलांच्या दुर्गुणांचा वारसा लाभलेला मालेराव मात्र राज्यकर्ता म्हणून अगदीच अयशस्वी ठरला. एका निरपराध माणसाचा त्याने खून केला आणि त्याचं भूत मानगुटीवर बसले ह्या भयाने तो मरण पावला.त्याच्यापाठोपाठ त्याच्या दोन कोवळ्या वयाच्या पत्नी सती गेल्या. त्यातच काही काळात नातू नथोबा अल्पशा आजाराने मरण पावला.

अशात गंगोबा तात्या राघोबा पेशव्यांना हाताशी घेऊन होळकरांच्या राज्यावर सैन्य घेऊन आले तेव्हा ह्या करारी स्त्रीने त्यांना बांगड्यांचा अहेर पाठवून निरोप धाडला, "आपण युद्ध करायला येताय तर या, पण युद्धात तुम्ही जिंकलात किंवा हरलात तरी प्रतिष्ठा तुमचीच पणाला लागणार आहे, कारण एका स्त्रीवर आक्रमण करण्याचे लांछनच तुमच्यावर लागेल" या निरोपाने आणि अहेराने दोघेही चपापले आणि भेटीस्तव आलोय असा साळसूद भाव अंगीकरला.

ज्याचा आधार वाटवा असा एकमेव पुतण्या तुकोजीही महादजी शिंदेंना सोबत घेऊन दगाबाजीवर उतरला तेव्हा अहिल्याबाईंनी त्याचीही कानउघडणी केली. राज्यकारभार करताना हे असे अनेक अडथळे

येतच होते. या सगळ्यासोबत ह्या खंबीर कर्तृत्वान स्त्रीचे समाजहित सुरूच होते. घाट, मंदिर, धर्मशाळा बांधणे, अडल्यानडल्यांना मदत करणे, माहेश्वरला हातमाग केंद्र उभारणे. अशी ही राणी रयतेवर आणि रयत त्यांच्यावर पुत्र-मातृवत प्रेम करत होते. अशा

समाजहित बघणाऱ्या अहिल्याबाईंच्या वैयक्तिक आयुष्यात मात्र तीळमात्र सुख असू नये यासारखी शोकांतिका ती काय!

एकामागून एक घरातील कर्त्या पुरुषांची निधनं, डोळ्या समोर चौदा तरुण स्त्रियांना सती जाताना पाहणं हे सगळं जिवंतपणी मरण यातनाच होत्या. ह्या सगळ्यात जरी वरून त्या खंबीर दिसत होत्या, पण आतून पार खचल्या होत्या. मुखाने सतत ॐ नमः शिवाय या मंत्राचा जप सुरु होता आणि अशातच सतराशे पंचांहत्तर या वर्षी देवी शिवपदी लीन झाल्या.

रयत म्हणत राहिली, "अशी राजयोगिनी पुन्हा होणे नाही."

# आईपण..

## तनुजा पत्की

मेघा नी घड्याळात पाहिलं ११ वाजले होते, सर्व घरावर नजर टाकली मुलं शाळेत गेलेली, नवरा त्याच्या कामावर. घर शांत होत जिथल्या तिथे, सुबक सुरेख.

ती अंगणात आली, थोडी फार हौस म्हणुन लावलेली फुलं आणि तुळस, एक झोपाळा. तिने अंगणात आणि तिथून घरामध्ये उगीचच चकरा मारल्या. ती इतकी अस्वस्थ होती की तिला समजेच ना असं का होत आहे.

उगीचच रडायला आलं कारण तर नव्हतंच काही, तिची आजी असती तर बोलली असती की सुख दुखतंय का तुला?

चांगला नवरा, साधी आणि हुशार मुलं सगळं काही तर होतंच तिच्याकडे तरी असं का व्हावं, हे कारण काही कळेना. रडू येणं, कारणाने मूड जाणं कशाचं लक्षण होतं हे काही केल्या समजत नव्हतं तिला.

संवादाची किती गरज असते हे प्रत्येक वेळी नव्याने जाणवायचं. नवऱ्याच्या सतत बदल्या व्हायच्या नोकरीनिमित्ताने. तिची मूळं कुठे खोलवर रुजलीच नाही.

मैत्रिणी झाल्या... पण मनातलं खूप काहीतरी बोलावं, खूप सांगावं, खळखळून हसावं आणि अगदी रडावं सुद्धा असं कोणी भेटलंच नाही.

आता चाळीशी पार केल्यावर या टप्प्यावर हे असं का होतंय आपल्यासोबत ते सुद्धा कळेना तिला. नवरा उत्तम मित्र व्हायचा खरंतर पण त्याला याचा गंधच नव्हतं.

आणि हे असं सतत व्हायचं, सतत रडू येणं, सतत मूड बदलणं, कोण समजणार होतं??

हे चाळीशी नंतर स्वाभाविक आहे. हार्मोन्स चेंज होणार आणि असं वाटणार यामध्ये काहीही चूक नाही. ही शारीरिक रचना आहे आणि मनाची सुद्धा! हे सुद्धा तिला कळत नव्हतं.

सल्ले देणारे खूप होते. योगा कर, ध्यानधारणा कर, कशाततरी मन गुंतव, मग असं काहीही वाटणार नाही... असं सांगणारे.

"उद्या आपण भेटू, मग तुला छान वाटेल"

असं सांगणारे भरपूर होते. पण या सगळ्यासाठी जे मन जागेवर हवंय, ते समजणारा नव्हताच कुणी.

हे सगळं संपवून टाकावं कधीतरी असंही वाटायचं तिला. पण मुलं आठवायची. स्वतःचं लहानपण आठवायचं आणि जो पोरकेपणा काढला आई नसल्यामुळे तो अगदी अंगावर यायचा तिच्या. हेच त्रास आपल्या मुलांना नको असं वाटायचं. पण या मानसिक थकव्याने अगदी बेजार झाली होती ती. प्रश्न खूप होते पण उत्तरच नव्हतं कशाचं.

ती स्वयंपाक घरात आली. तिने चहा ठेवला आणि एक मोठा कप भरून ती परत झोपाळ्यात येऊन बसली. हातात पुस्तक घेतलं वाचण्यासाठी. पुस्तकावरून नजर फिरत होती पण अर्थ डोक्यात जात नव्हता. सतत विचारांचं काहूर चाललं होतं

उत्तर शोधणं खूप गरजेचं होतं. जीव जाणं इतकं स्वस्त नव्हतं आणि मन स्थिर आणि शांत होणं खूप गरजेचं होतं. तिने बाहेर पाहिलं. दोन लहान गरीब मुलं तिला बाहेर साफ सफाई करताना दिसली .

खेळण्याचं वय असलेल्या वयात ही मुलं काम करतात ? तिच्या मनात आलं.

त्यांची आई कुठेतरी आसपास असावी या विचारानं ती झोपाळ्यावरून उतरली आणि त्या मुलांच्या जवळ गेली. "आई कुठे आहे तुमची?" तिने विचारलं.

"आई नाही."

असं मुलं बोलल्यावर तिला धक्का बसला. "खाल्लं का काही?" तिने विचारलं.

मुलगी मोठी होती १३ किंवा १४ वर्षांची असावी. मुलगा लहान होता. दहा वर्षांचा असावा.

मुलगी बोलली, "आमची आई आम्ही लहान असतानाच गेली. वडील पण नाहीत. वडील आठवतंच नाही".

अशी छोटी मोठी कामं करतो आणि मिळाले पैसे की खातो.

ती तशी हळव्या मनाची होतीच.

या मुलांकडे बघून स्वतःचे दुःख तिला अगदी किरकोळ वाटायला लागलं, तिला वाटलं, प्रश्न आधी पण होते जगात... पण ते पाहायची नजर नव्हती तिच्याकडे. म्हणुन कदाचित सिंधू सपकाळ एखादीच होते.

ती हजारोंची माय होते.

एखादी बहिणाबाई कवितेमध्ये उमटते.

हेच कदाचित देवाने दिलेलं उत्तर असावं तिच्यासाठी.

तिलाही होतेच की खूप सारे मित्र मैत्रिणी.

छान प्रत्यक्ष भेटत नसतील, पण होते खरे.

हा मोबाईल नाही का तिच्यासाठी...

नवीन जग उघडं केलं, वाईटच का घ्यावं? चांगलं घेण्यासाठी खूप आहे की!

रडायला आलं तर रडावं... हसायला आलं तर हसावं सुद्धा!

कदाचित मन मोकळं होईल आणि शांत सुद्धा!

तिने त्या मुलांना घरात बोलवलं. त्यांना जेवणासाठी दिलं.

माझे हात मजबूत नाहीत. मला माझ्या खूप साऱ्या मर्यादा आहेत तिला वाटलं. पण त्या मर्यादित राहूनही खूप काही करता येईल, असं वाटलं.

तिने मुलीला नाव विचारलं... ती म्हणाली "मी आशा आणि माझ्या भावाचं नाव आनंद."

किती समर्पक!!

तिला आवडलं.

ती म्हणाली "रोज येत जा माझ्या घरी. घरचं जेवायचं आणि मग तुमच्या कामावर जायचं."

मला एवढं तरी करता येईल, आणि मला त्याचा आनंद होईल.

आशा एक मिनिट शांत बसली पण मग तिच्या चेहऱ्यावरती हसू आलं.

नमस्कारासाठी हात जोडले तेव्हा तिने हात हातात घेतले आणि ती म्हणाली "याची गरज नाही".

प्रयत्न छोटा असला तरी तो करावा अशी माझी स्वतःची इच्छा आहे. कदाचित मी खूप मोठी नाही होऊ शकत पण मी सुरुवात तर नक्की करु शकते. मला कदाचित हजारांची माय नाही होता येणार, पण माझा खारीचा छोटा प्रयत्न करायला काय हरकत आहे.

दोन्ही मुलं पोटभर जेवली आणि आनंदानं गेली.

दुसऱ्या दिवशी यायचं कबूल करून...!!

आनंद 'देण्यात' आहे; हे तिला मनातून वाटलं.

कुणावर प्रेम करण्यात आहे... कुणाला जीव लावण्यात आहे... आणि कोणासाठी काही करण्यात आहे. त्यांनी जी शांती मिळते, ती कदाचित कशानेही नाही मिळणार.

तिचं मन शांत झालं.

तिनं हलकेच एक गाण्याची ओळ गुणगुणली, हातातलं पुस्तक परत बोलवतंय असं तिला वाटलं.

तिची नजर घरातल्या मंदिराकडे गेली.

मंदिरातला बाप्पा तिच्याकडे बघून हसतोय असं वाटलं तिला.

# सूर तेच छेडीता

## स्वर्णिमा प्रकाश

रात्रीचे ११:३० – ११:४५ झाले होते. सानवीला आज सगळं आवरायला जरा उशीरच झाला होता. घरातील सगळी कामं आवरून ती पाठ टेकवणार इतक्यात तिला मेन डोअर उघडल्याचा आवाज आला.

“एवढ्या रात्री कोण आलं असेल? आणि चौकीदार, तोही कुठे दिसत नाही आहे, झोपला की काय कोण जाणे! सानवी तिच्या रूमच्या खिडकीतून बघत स्वतःशीच पुटपुटली. बरं जाऊदेत मीच बघते कोण आहे ते.”

सानवी बेडरूम मधून हॉल मध्ये येईपर्यंत तिला हॉलचा दरवाजा कोणीतरी बाहेरून उघडण्याचा प्रयत्न करत असल्याचं जाणवलं. कितीही नाही म्हटलं तरी रात्री १२ च्या सुमारास हा सगळा प्रकार कोणालाही घामाघूम करणाराच! हाताशी काहीतरी असू द्यावं म्हणून सानवीने हातात लाटणं घेतलं; ती दरवाजाच्या दिशेने जावू लागली आणि इतक्यात समोरून दार आत ढकलल्या गेलं. ती लाटणं डोक्यात घालणार तोच समोरून आवाज आला,

“अगं ए सानवी! थांब! मी आहे समीर. तुझा लग्नाचा सख्खा एकुलता एक नवरा!”

सानवी आश्चर्याने दोन मिनिटं नुसतीच बघत उभी होती.

“समीर तू !”

“ए हळू बोल न जरा, एवढ्या रात्री जोरात काय ओरडतेस?”

“सम्या, लोकं हळू कसं ओरडतात ते सांग बरं जरा! नाही, दाखवच तू मला हळू ओरडून! आणि एक मिनिट, तू आत्ता इथे काय करतोयस?”

“हं?”

“हा काय प्रश्न आहे? अगं हे माझं घर आहे नं?”

“हो रे. तुझंच घर आहे, पण मला असं म्हणायचं आहे की तू तर दोन दिवसांनी येणार होतास ना? मग असा अचानक लवकर कसा काय आलास?”

"अरे माझ्या कर्मा!" आपल्याच कपाळाला हात मारत समीर म्हणाला. " सानवी  हे ही तुला  आता त्रासदायकच झालं आहे का गं? या बिचाऱ्या, भोळ्या भाबड्या तुझ्या नवऱ्याने अजून किती काय काय सहन करायचं गं?!"

"ए गप रे नौटंकी कुठला!"

"अगंऽऽऽ!"

"अगं काय अगं! यायच्या आधी घरी बायकोला कळवण्याची पद्धत नाही वाटतं तुम्हा कारखानीसांमध्ये?"

"माते, चुकलंच माझं, क्षमा असावी. पुढच्या वेळेस टूर आटपायच्या  चार दिवस आधीच सांगेन. तू म्हणत असशील तर आता खलिता सुद्धा पाठवायला तयार आहे मी मग तर झालं! आणि हा, आताच म्हणशील तर काम लवकर आटोपलं म्हणून आलो लवकर. म्हंटल आपल्या लाडक्या एकुलत्या एक बायकोला द्यावं जरा सरप्राईज. पण काय आता, बायको साधं घरात सुद्धा घेत नाहीये. अगं तुझ्यापेक्षा ती शेजारच्या रघूची बायको तरी बरी!"

"का ते?"

"मी नुसता दिसलो तरी घरी या ना  असं म्हणते. चहा घेऊनच जा, की डायरेक्ट जेवताच? वर असंही विचारते!"

"बरं, मग आता तिच्याचकडे जा. छान चहा पी, नाश्ता कर, जेव, दुपारचा चहा पी आणि रात्रीचं पण तिथेच जेव आणि कायमचा तिथेच रहा!" सानवी जरा रागातच म्हणाली.

"अशी चिडतेस काय गं, गंमत करत होतो मी. आणि ती लाख बोलवेल पण मी खरंच जाणार तरी आहे का? असो. पण सानवी कसली गोड दिसतेस गं तू चिडलीस की."

"काहीतरीच असतं तुझं."

"अगंबाई! चक्क लाजते आहेस तू! वा वा! हे ही येतं वाटतं आपल्याला! आणि सानवी काहीतरी काय, खरं तेच सांगतोय मी. तू चिडलीस की खूप गोड दिसतेस. बरं मॅडम ते सगळं ठीक आहे, पण तू मला खरंच घरात घेणार नाहीये का दोन दिवस?"

"अरे काय रे समीर तू ,ये ये – वेल्कम होम. तुझ्याच घरात, सॉरी! आपल्याच घरात तुझं स्वगात आहे."

"तेही मध्यरात्री साडे बारा वाजता!"

कॉमेडीचं टायमिंग सांभाळत समीरने लगेच पंच टाकला.

गेल्या ३-४ आठवड्यांपासून नुसतीच नीरव शांतता असणाऱ्या घरात  मात्र आता गेल्या तासाभरापासून मस्त हसण्याचे, खिदळण्याचे आवाज रुंजी घालू लागले होते.

गप्पांच्या  नादात पहाट कधी झाली हे दोघांनाही कळालंच नाही.

“बापरे! पहाटेचे ४ वाजलेत!” मोबाईल मध्ये वेळ बघत सानवी म्हणाली. अरे यार! आत्ता फक्त २ तासांसाठीच काय झोपायचं, जाऊदेत उठून कामालाच लागते.”

 “सानवी कमालच करतेस तू. उठायला आधी झोपावं पण लागतं गं.”

“समीर तुला एक सांगू का रे..?”

“हम्मम बोल बोल.. ऐकतोय मी (लग्नझाल्यापासून तुझंच तर ऐकतोय!)”

“तू इथे नव्हतास  ना तेच फार बरं होतं, किमान असे फालतू विनोद तरी कानी पडत नव्हते.”

“ए हेल्लो.... एकेकाळी याच सो कॉल्ड ‘फालतू’ विदोनांवर मरायचीस तू.... आणि पोट दुखेपर्यंत हसायची सुद्धा! लग्न थोडंसं जुनं काय झालं चक्क सगळं विसरलीस तू!”

“एका अर्थी बरंच आहे ना पण ते! अशा चुका लक्षात ठेवूनही काय करायचं आहे.”

“माझ्याशी लग्न करणं ही तुला तुझी चूक वाटते! एवढ्या लवकर उपरती झाल्या बद्दल बाई आपणास कोपरापासून नमस्कार! माते ! आपणास चुकून झोपावयाचे असल्यास शेजारची जागा रिकामीच आहे. कधीही अगदी निःसंकोचपणे आपण मज शेजारी निजू शकता, माझे काहीही म्हणणे नाही.”

‘“तुझं म्हणणं असलं तरी त्याने मला काही फरक पडत नाही सम्या.” मक्ख चेहरा करत सानवी उत्तरली.

“आणि तसंही आता कसली येतेय झोप! तू झोप मी लागते कामांना.”

‘तू झोप’ ही पडत्या फळाची आज्ञा पाळत समीर जवळ जवळ झोपायला आलेला. नेहमीच्या सवयीप्रमाणे पांघरूण डोक्यावरून घेणार तोच सानवी एकदम किंचाळली...

“ए सम्या, परवा आपली लग्नाची दहावी एनिवर्सरी आहे रे!”

सानवीचं किंचाळणं ऐकून इसीसच्या एखाद्या माणसाकरवी  तिला किडनॅप करण्याचा प्रयत्न केला आहे की काय असं कोणाला वाटावं. अहो कोणाला कशाला समीरचेच हावभाव हे स्पष्ट करत होते. छातीची धडधड जरा मंदावल्यावर समीर म्हणाला, “सानवी, एवढ्याने नको गं किंचाळत जाऊस. तुझं हे असं ओरडणं ऐकून लोकांना वाटायचं की मी त्रास देतो आहे तुला! डोमेस्टिक व्हॉयलन्स ची केस व्हायची गं आपल्यावर. सॉरी माझ्यावर! आणि अगं म्हणजे किती भयानक व्हायचं गं मग ते..”

"काय? काय भयानक होईल ?"

" हेच गं, की एका पिडीत, शोषित व्यक्तीच्याच विरुद्ध घरगुती हिंसाचाराची केस म्हणजे...! सानवी, देवाला तरी घाबर गं. देवाला तरी घाबर."

"सम्या, आता हातातला जार फेकून मरीन हं मी तुला"

"बघा बघा, हेच म्हणत होतो मी आता"

" गौर से देखिये मेरे चेहरे को.. मै ही हूँ वह पिडीत, शोषित, बेचारा माणूस जो गेले नऊ वर्षसे इस जालीम बाईके साथ संसार कर रहा हैं!"

" सम्या तू तर गेलास आता... खूप झालं तुझं!"

लहान मुलांनी घर डोक्यावर घ्यावं तसं झालं होतं समीर आणि सानवीचं. एखाद्या बाहेरच्या माणसानी अगदी चुकून जरी ह्यांना आता असं बघितलं तर त्यांचासुद्धा विश्वास बसणार नाही की एक नामवंत ,यशस्वी अशी मानसशात्रज्ञ आणि एक उत्तम बिझनेसमेन भांडतायत म्हणून!

असेच हासत खिदळत मध्ये मध्ये भांडत दोन दिवस चटकन उडून गेले आणि अखेर समीर कधीही न विसरू शकणारा असा तो दिवस आलाच. अहो, कधीही न विसरू शकणारा म्हणजे, अविस्मरणीय, कायमस्वरूपी लक्षात राहणारा असा तो दिवस – त्यांच्या एनिवर्सरीचा.

लोकांच्या एनिवर्सरीची सुरुवात एकमेकांना छान विश करून होते, पण आमच्या या नायक आणि नायिकेची मात्र कोणी आधी विश केलं यावरून भांडत सुरुवात झाली.

"सानवी .., सम्या नाही, मी आधी विश केलं आहे."

" सानवी नाही, मी केलं आधी केलं विश."

" सम्या नाही मी विश केलं आहे."

" नेहमीचं आहे तुझं सानवी हे. दरवर्षी काय भांडतेस गं. एखाद्या वर्षी तरी दे गं नवऱ्याला बेनिफिट ऑफ डाऊट."

" बापरे! आलं का लगेच तुझं बेनिफिट ऑफ डाऊट? घ्या !

ठीक आहे,आता काय, घ्या तुमचं बेनिफिट ऑफ डाऊट पण तरीही मीच आधी विश केलं आहे तुला समीर."

"हात टेकलेत मी तुझ्यापुढे. तू जिंकलीस, मी हरलो. झालं! आपकी जीत वो मेरी जीत. बरं ऐक आज सगळं मी करणार आहे. तू मस्त आराम करायचास आणि ऑर्डर्स सोडायच्या, नेहेमी सोडतेस अगदी तशा."

"ओके. डन. ठरलं तर मग."

“मस्त चहा करतो आधी, मग बघू पुढचं पुढे.”

“चालेल. कर तू चहा आलेच मी तोपर्यंत.”

“येस मॅम.”

आधी चहा, मग छान सानवीचे आवडते, समीरच्या हातचे छोले भटुरे , गुलाबजाम, जीरा राईस आणि आईसक्रीम असा मस्त बेत, त्यानंतर सगळ्यांची आवडती आणि हवीहवीशी वाटणारी वामकुक्षी. असा मस्त दोघांनी एकत्र दिवस घालवला.

अगदी पहिल्या एनिवर्सरी पासून ठरल्यानुसार आजही संध्याकाळी दोघांच्या घरचे आणि काही जवळची मित्रमंडळी संध्याकाळी घरी आलीत. मग काय, धमाल नुसती. दोघांचेही आई-बाबा आणि सतत मानगुटीवर बसलेलं मित्रमंडळ असल्यावर दुसरं अपेक्षित तरी काय!

थोड्या गप्पा- टप्पा झाल्या आणि मग केक कटिंग.

केक कापून झाल्यावर समीर एकदम बोलू लागला..

“ सानवी, हैप्पी एनिवर्सरी. आज दहा वर्ष झालीत आपल्या लग्नाला. बापरे! अगदी आताचीच गोष्ट वाटते गं. या दहा वर्षात बरेच चांगले वाईट प्रसंग आलेत , बांधलेली साताजन्माची गाठ सुटते की काय असं वाटावं अशी १ – २ वेळेला भांडणही झालीत. पण आपण मतभेद सोडवून बांधलेली गाठ आणखी घट्ट केली. सुरुवातीच्या काळात सगळंच नवीन असतांना मला सुद्धा वाटलं नव्हतं की आपण ही जबाबदारी पार पाडू शकू म्हणून. पण आपल्या दोघांच्याही आई बाबांकडे बघून विश्वास वाटतो. नातं टिकवून ठेवायची एक वेगळीच उर्जा निर्माण होते.

सानवी, आजपर्यंत न मागता आपण दोघांनीही एकमेकांना बऱ्याच गोष्टी दिल्यात. पण आजपर्यंत जी तुझी एक इच्छा मी कधीही पूर्ण नव्हती केली ती आज पूर्ण करणार आहे. आणि मला खात्री आहे की ते तुला नक्कीच आवडेल.

समीर बोलता बोलता सानवीच्या बाबांपुढे गुडघ्यांवर बसला आणि पुढे बोलू लागला..,

“बाबा, आमचं लग्न ठरलं न तेव्हा मला वाटलं होतं की सावनी खूप शांत, समंजस, सगळं धीराने सांभाळून घेणारी आहे. नाही, ती तशी आहेच, पण ना तिच्या आत दडलेलं खोडकर, खट्याळ लहान मूल मात्र मला दोन वर्षांनी हळूहळू दिसायला लागलं. आम्ही एकमेकांसोबत बऱ्यापैकी कम्फर्टेबल झाल्यावर ती मला एकदा म्हणाली ”

“ सम्या नको ना!” सानवी मधेच बोलली.

“थांब गं सानवी.”

"हा, तर बाबा, तुमची लाडकी लेक, म्हणजे माझी प्रिय बायको मला म्हणाली,

" समीर तू हसणार नसशील तर एक सांगू..

म्हटलं बोल नं, त्यात काय एवढं."

" समीर, मला न असं वाटत होतं की..."

"की ?"

"की.. तू मला आपलं लग्न ठरल्यानंतर साखरपुड्याच्या तेवढ्यात वगैरे प्रपोज करावंस.

बघ, मला माहिती होतं तू हसशील म्हणून. म्हणून मी सांगणार नव्हते!"

"अगं सानवी काही काय बोलतेस तू. आपलं लग्न ठरल्यावर प्रपोज करु?" कसं गं ते? आणि काय म्हणणार होतो मी तुझ्या बाबांना, की तुम्ही लग्न ठरवलंच आहे, पण आता माझ्या होणाऱ्या बायकोची फँटसी म्हणून मी तुमच्याकडे तिचा हात मागतो. कसलं फनी आहे हे.

त्यावेळेला मी फारसं मनावर घेतलं नाही हे आणि मला खूप आश्चर्य पण वाटलं होतं तिच्या बोलण्याचं. म्हणजे थोडक्यात सांगू का, ऑनलाईन आयफोन मागवल्यावर प्रत्यक्षात मात्र रीनची वडी आल्यावर समोरच्याला कसं वाटेल, तसं झालं होतं माझं. पण गंमत सुद्धा वाटली होती.

पण आज मला तिची ही इच्छा पूर्ण करायची आहे, कारण ती आणि तिच्या सगळ्या इच्छा माझ्यासाठी त्या आयफोन पेक्षाही खूप महत्वाच्या आणि मोलाच्या आहेत.

आई बाबा, तुमच्या या लाडक्या लेकीचा हात आज परत एकदा त्याच विश्वासानी माझ्या हातात द्याल? मी वाचन देतो तुम्हाला आधीपेक्षाही खूप सुखात ठेवीन तिला, कुठलाच त्रास मी तिला होवू देणार नाही आणि मी स्वतःही करून घेणार नाही. तुमच्या मुलीची सगळी बडबड आतापर्यंत जशी निमूटपणे ऐकत आलो तसाच यापुढेही ऐकीन. तिने कितीही जार फेकून मारलेत, फोडलेत तरी तिला स्टीलचा का होई ना पण नवीन जर गिफ्ट करेन.

आई-बाबा द्याल न तुमच्या मुलीचा हात माझ्या हातात?"

समीरचं हे बोलणं ऐकून तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाच्याच डोळ्यांचा कडा जरा ओलावल्या होत्या. उपस्थितांपैकी कोणालाच काय बोलावं ते कळत नसल्याने फक्त शांतताच आपलं अस्तित्व ठळकपणे दाखवून देत होती.

सानवीच्या बाबांनी समीरला उठवत सानवी जवळ उभं केलं.

" सानवी , अगं काय म्हणतोय हा.. इतका छळ होत असतांना सुद्धा त्याच जेलर सोबत रहायचं म्हणतोय गं हा कैदी. काय धाकात ठेवलायस गं बाई तू आपल्या नवऱ्याला!"

"काय हो बाबा तुम्हीपण."

"गंमत गं जराशी. बरं पण आता यावर काय म्हणणं आहे तुझं? द्यायचा ना  तुझा हात आम्ही समीरला ? की काही वेगळा विचार केला आहेस तू आत्ता ?"

"बाबा.....असं कसं दुसरा विचार वगैरे..."

सानवीचे डोळे पुसत तिचे बाबा तिचा हात समीरच्या हातात दिला. दोघांनीही त्यांना नमस्कार केला. समीरच्याही आई-बाबांना नमस्कार करून पुन्हा एकदा नव्याने संसाराची सुरुवात केली.

आणि यासगळ्याची फलश्रुती म्हणून त्यांच्या मित्रमंडळानी background ला गाणं लावलं

**"सूर तेच छेडीता.. गीत उमटले नवे..**

**आज लाभले सखी सौख्य जे मला हवे...!"**

